फुलशेती

# हंगामानुसार ॲस्टर लागवडीचे नियोजन



**प्रा. संजय बडे**
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

ॲस्टर हे एक महत्वाचे व्यापारी फुलपीक आहे. विविध रंगछटांची नैसर्गिक देणगी, टिकाऊपणा आणि नाजूकपणा यामुळे लोकप्रिय ॲस्टरचे फूल वर्षाच्या कोणत्याही हंगामात फायदेशिररित्या घेता येते. भारतातील वैविध्यपूर्ण हवामानात तीनही हंगामांत या फुलझाडांची लागवड करता येते. फुलांच्या लांब दांड्यांमुळे फुलदाणी व पुष्पगुच्छामध्ये तसेच हार व सजावटीत विशेषत: दसरा, दिवाळी आणि नाताळ या सणांमध्ये ॲस्टरच्या सुट्या फुलांचे विशेष महत्त्व आहे.

**जमीन** : जमीन ही मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी निवडावी. काळ्या कसदार, भारी व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत रोपांची मर मोठ्या प्रमाणात होते.

**लागवडीचा योग्य हंगाम** : ॲस्टरची लागवड खरिपात (जून - जुलै) आणि रब्बी (ऑक्टोबर - नोव्हेंबर) अशा हंगामात करता येते. मध्यम प्रकारच्या हवामानात सौम्य उन्हाळ्यात सुद्धा हे पीक (जानेवारी - फेब्रुवारी ) दरम्यान घेता येते. या पिकाच्या वाढीसाठी भरपूर सूर्यप्रकाश आणि १०- १५ से. तापमान पोषक आहे.

**सुधारित वाणांची निवड** : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या जाती- १) फुले गणेश (निळा) २) फुले गणेश (पांढरा) ३) फुले गणेश (लाल/गुलाबी) ४) फुले गणेश (जांभळा).

**बुटक्या जाती** : ड्वार्फ क्वीन, स्टार डस्ट, नवीन जाती:- सनशाईन, प्रिन्सेस, अर्ली जायंट क्वीन ऑफ मार्केट.

**इतर जाती** : कामिनी, पौर्णिमा, शशांक व्हायोलेट क्युरान.

**ॲस्टरची अभिवृद्धी** : ही बियांपासून केली जाते. प्रथम बियांपासून गादीवाफ्यावर रोपे तयार करतात. रोपे योग्यवेळी कायमच्या जागी स्थलांतरित केली जातात.

**लागवड** : ॲस्टरची लागवड सपाट वाफे अथवा सरी- वरंब्यावर केली जाते. ॲस्टरची लागवड ही ६० X ३० सें.मी., ४५ X ३० सें.मी. अथवा ३० X ३० सें.मी. अंतरावर केली जाते.

**रोपे तयार करणे (रोपवाटिका)** : ॲस्टरची लागवड रोपे तयार करून केली जाते. लागवडीपूर्वी ३ ते ४ आठवडे गादीवाफ्यावर रोपे तयार करावीत. १ मी. रुंद, १२ ते १५ सें.मी. उंच व योग्य लांबीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यावरील पेरणीनंतर २० ते ३० दिवसांत रोप चार ते सहा पानांवर येतात. तयार झालेली रोपे वाफे वाफसा अवस्थेत असतानाच काढावीत. साधारणत: हेक्टरी १ ते १.५ किलो बियाणे पुरेसे होते.

**खत व्यवस्थापन** : ॲस्टरला वरखते आणि भरखते यांच्या मात्रा योग्य प्रमाणात देणे गरजेचे आहे. सपाट वाफे करून रोपांचे स्थलांतर करण्यापूर्वी एस.एस.पी.२५० किलो व सल्फेट ऑफ पोटॅश १०० किलो प्रतिहेक्टर द्यावे. पहिल्या व दुसऱ्या खुरपणीदरम्यान सल्फेट ऑफ अमोनिया २५० किलो व सल्फेट ऑफ पोटॅश १०० किलो प्रतिहेक्टर फुलझाडास घालावे. रोपांना कळ्या लागल्यानंतर २ किलो युरियाचे द्रावण, सूक्ष्म अन्नद्रव्ये मिसळून फवारल्यास फुले रंगदार होतात. टिकाऊपणा वाढून उत्पन्नात भरीव वाढ होते.

**पाणी व्यवस्थापन** : ॲस्टर पिकाच्या मुळ्या जास्त खोल जमिनीत जातात त्यामुळे लागवड केलेले वरंबे नेहमी वाफसा अवस्थेत राहतील याची काळजी घ्यावी. साधारण ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. कळ्या येण्याच्या वेळेस पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी.

**फुलांची योग्य वेळी तोडणी** : जातीनुसार अडीच ते चार महिन्यांत ॲस्टरला फुले येतात. या फुलांच्या साधारणपणे सात तोडण्यांमध्ये बहार संपतो. फुलांची तोडणी दोन ते तीन दिवसांच्या अंतराने करावी. ॲस्टरची पूर्ण उमललेली फुले १० ते २० सें.मी. दांड्यासह कापून घ्यावीत. पाच ते सहा फुले एकत्र बांधून जुड्या तयार कराव्यात. या जुड्या विक्रीसाठी पाठवून द्याव्यात.

**उत्पादन** : उत्पादन हे प्रतिहेक्टरी ६ ते ८ मे. टन मिळते. म्हणजेच ॲस्टरच्या ५ किंवा ६ फुलांच्या एक लाख जुड्या मिळतात. ■